गुंतवणूक मार्गदर्शन

**आपण व्हॅल्यू इन्व्हेस्टर की ग्रोथ इन्व्हेस्टर?**

## गुंतवणूक करण्यापूर्वी, तुम्ही कोणत्या प्रकारचे गुंतवणूकदार आहात किंवा तुम्हांला कोणत्या प्रकारचे गुंतवणूकदार व्हायचे आहे हे जाणून घेतले पाहिजे?

तुम्ही कोणत्या प्रकारचे गुंतवणूकदार आहात? जाणून घ्यायचे आहे? तर या प्रश्नांची उत्तरे द्या.

(१) **व्हॅल्यू इन्व्हेस्टर :** तुम्हांला चांगल्या दर्जाची, सवलतीत खरेदी करण्याची सवय आहे का? जर उत्तर होय असेल तर तुम्ही व्हॅल्यू इन्व्हेस्टर आहात. हे असे गुंतवणूकदार आहेत जे कंपन्यांचे खरे मूल्य (व्हॅल्यू) शोधतात आणि जेव्हा त्यांना त्यांचे शेअर्स त्या मूल्यापेक्षा चांगल्या सवलतीत मिळतात तेव्हाच ते त्या शेअर मध्ये गुंतवणूक करतात. त्यांनी कंपनीचे संपूर्ण आर्थिक विश्लेषण केलेले असते – महसूल, रोख प्रवाह, नफा, ऐतिहासिक कामगिरी आणि अशा अभ्यासांमुळे अशा अभ्यासामुळे, व्हॅल्यू इन्व्हेस्टर असे स्टॉक निवडतात की, जे त्यांच्या पुस्तकी मूल्याच्या किंवा खऱ्या मूल्याच्या (ट्रु व्हॅल्यू) सवलतीत मिळत आहेत. असे गुंतवणूकदार चांगल्या फंडामेंटल्स असलेल्या कंपन्या शोधतात. जेव्हा त्यांना त्यांचे शेअर्स योग्य किंमतीत मिळतात तेव्हा ते संयमाने गुंतवणूक करतात आणि बाजारातील किंमत त्यांच्या गणनेनुसार पुस्तकी

INTERNAL

मूल्यापेक्षा किंवा खऱ्या मूल्यापेक्षा (ट्रु व्हॅल्यू) अधिक चांगल्या प्रीमियम पर्यंत पोहोचेपर्यंत तितक्याच संयमाने होल्ड करतात करतात. मूल्य गुंतवणुकीमागील तर्क असा आहे की जेव्हा तुम्ही एखाद्या शेअर्सचे खरे व आंतरिक मूल्य ठरवता आणि सवलतीच्या दरात खरेदी करता, तेव्हा तो स्टॉक जरी खाली गेला आणि त्या स्टॉकने तुमच्या अपेक्षेप्रमाणे कामगिरी नाही केली, तरी तुम्हांला फार थोडे पैसे गमवावे लागतील. त्याच वेळी, जेव्हा स्टॉक रॅली येईल, तेव्हा ते प्रीमियमवर क्वोट केले जाईल आणि तुम्हांला तुमच्या अपेक्षेपेक्षा जास्त कमाई गुंतवणुकीवर मिळेल. व्हॅल्यू इन्व्हेस्टर प्रामुख्याने सर्वप्रथम लार्ज-कॅप कंपन्यांच्या शेअर्स कडे पाहतात.

(२) **ग्रोथ इन्व्हेस्टर :** तुम्ही कोणत्या प्रकारचे गुंतवणूकदार आहात? दुसरा प्रश्न असा आहे की गळाकापू स्पर्धेच्या युगात कोणतीही कंपनी, त्यांचे प्रवर्तक (प्रमोटर), त्यांच्या योजना इत्यादींचा अभ्यास करून त्या कंपनीच्या विकासावर विश्वास ठेवण्या सोबतच तुमचाही विकास होईल यावर तुमचा विश्वास आहे का? प्रवर्तक कामगिरी करण्यात अयशस्वी झाल्यास, त्यांच्या योजना अपेक्षेप्रमाणे यशस्वी झाल्या नाहीत, तर त्यांच्या या अपयशामुळे होणारे नुकसान तुम्ही पचवू शकता का? जर उत्तर होय असेल, तर तुम्ही विकास करणारे गुंतवणूकदार आहात. इंग्रजीत त्यांना ग्रोथ इन्व्हेस्टर असेही म्हणता येईल.

असे ग्रोथ इन्व्हेस्टर भांडवलाच्या वाढीवर लक्ष केंद्रित करतात आणि त्या टप्प्यावर वृद्धी क्षमता असलेल्या तरुण कंपन्यांची ओळख करून त्यात गुंतवणूक करतात. ग्रोथ इन्व्हेस्टर कंपन्यांमध्ये, प्रवर्तकांच्या क्षमतेमध्ये गुंतवणूक करतात आणि जेव्हा त्या कंपन्या यशस्वी होतात तेव्हा त्यांना भांडवलाची चांगली

INTERNAL

रक्कम मिळते. तथापि, हे लक्षात ठेवले पाहिजे की जर कंपनीची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही तर ग्रोथ इन्व्हेस्टर गुंतवलेली मूळ रक्कम गमावण्यासाठी सुद्धा तयार असतात.

संपूर्ण मूळ रक्कम गमावण्यास कोण सक्षम आहे हे जाणून घेण्यासाठी तुम्ही तुमची जोखीम प्रोफाइल तयार करावी. तुमची जोखीम घेण्याची क्षमता काय आहे? हे जाणून घेणे आवश्यक आहे.